" ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यांसाठी शिक्षणप्रसार "
– शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे



**श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे**

# विवेकानंद ज्युनिअर कॉलेज, कोल्हापूर

कोल्हापूर

## हर घर तिरंगा अभियान अंतर्गत सायकल रॅली उपक्रम

### अ ह वा ल

बुधवार दि.14.08.2024 रोजी सकाळी 9.00 वाजता 78 व्या भारतीय स्वातंत्र्य दिनानिमित्त कनिष्ठ व वरिष्ठ राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने हर घर तिरंगा अभियान अंतर्गत जन जागृती निमित्त सायकल रॅलीचे आयोजन करण्यात आले. सदर सायकल रॅली अभियान मध्ये स्वातंत्र्य दिनाचा जयघोष करत स्वयंसेवकांनी विवेकानंद कॉलेज, ताराबाई पार्क कोल्हापूर या ठिकाणाहून शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर तसेच येताना दुसऱ्या मार्गाने परत विवेकानंद कॉलेज पर्यंत अशा भव्य कार्यक्रमाचे आयोजन केले.

घराघरांमध्ये देशाच्या स्वातंत्र्याचे महत्त्व पटवून देत प्रत्येक भारतीयाने आपल्या देशाच्या रक्षणासाठी व विकासासाठी आपले काय कर्तव्य आहे ? आपण आपल्या देशाला महासत्ता बनविण्यासाठी व विकसित करण्यासाठी काय केले पाहिजे ?

सामाजिक बांधिलकी, विश्वबंधुत्व तसेच समानतेची वागणूक देत असताना देशाच्या स्वातंत्र्यासाठी ज्या क्रांतिकारकांनी बलिदान दिले त्यांच्या कार्याची आठवण ठेवून देशकार्यात आपलाही सहभाग नोंदवावा हा उद्देश डोळ्यासमोर ठेवून स्वयंसेवकांनी लोकांमध्ये जाणीव जागृती करण्याचे बहुमोल कार्य केले. स्वातंत्र्य समता व बंधुता या त्रिसूत्रीचा स्वीकार करून शेवटच्या क्षणापर्यंत आपण या देशाच्या रक्षणासाठी आणि विकासासाठी तत्पर राहिले पाहिजे व आपल्या देशाला इतर देशांच्या तुलनेने शक्तिशाली कसे बनवता येईल ? जय जवान, जय किसान या ब्रीदवाक्यानुसार देशाला सुजलाम व सुफलाम करण्यासाठी आपण सर्व कटिबद्ध राहू. अशी अशी सर्व लोकांना जाणीव करून दिली.

हर घर तिरंगा या अभियानाच्या यशस्वीतेसाठी कॉलेजचे प्राचार्य मा.डॉ.आर आर कुंभार, प्रबंधक श्री आर बी जोग यांचे बहुमोल मार्गदर्शन लाभले. सदर अभियानामध्ये स्वयंसेवक बहुसंख्येने सहभागी झाले होते. ज्युनियर व सिनिअर कॉलेज राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी, प्रशासकीय कर्मचारी सर्व एन.एस.एस. सदस्य यांच्या सहकार्याने हा उपक्रम संपन्न झाला.

श्री. एल. एस. नाकाडी
**PROGRAMME OFFICER**
**N. S. S + 2**
**VIVEKANAND COLLEGE, KOLHAPUR**

डॉ.आर. आर. कुंभार
**प्राचार्य**
**विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर.**
**(अधिकारप्रदत्त स्वायत्त)**

# हर घर तिरंगा [सायकल रैली]

दि. 14.8.2024







